महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/सेप्र/न.क्र.४१/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
***मुंबई - ४०० ०१९.***

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १६६ दिनांक १२/०८/२००८

विषय : अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५ नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्या कार्यालयातील (गट-अ ते गट-ड) पदावर शारिरिकदृष्ट्या अपंगासाठी आरक्षण ठेवण्याबाबत.

संदर्भ : प्रशासकीय परिपत्रक क्र. २, दिनांक ४/१०/२००५.

-----

शासनाने उच्चत्तम न्यायालयाच्या दिनांक २३/१२/२००४ च्या आदेशाप्रमाणे अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५ च्या अधिनियमातील प्रकरण क्र. ६ मधील कलम ३२ व ३३ सुधारित समितीने तदर्थ मंडळातील अपंग व्यक्तीसाठी सुयोग्य पदे पत्र क्र. ईएसटी-००४/सीआर-८३९२/ऊर्जा-६, दिनांक ०१/०९/२००५ अन्वये घोषित केलेली होती. शारिरीक दृष्ट्या अपंग व्यक्तींसाठी आरक्षित व निश्चित केलेल्या सुयोग्य पदावर सरळ सेवेने उमेदवारांची भरती करताना त्याचप्रमाणे विभागीय पदोन्नती करताना सुधारित सूचनांचा अवलंब करणे आणि आरक्षण निश्चित करणेबाबतच्या सूचना प्रशासकीय परिपत्र क्र. २, दिनांक ०४/१०/२००५ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना योग्य त्या कार्यवाहीसाठी देण्यात आलेल्या होत्या.

२. आता उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय कामगार विभाग यांनी त्यांच्या शासन निर्णय क्र. ईएसटी-००४/सीआर-८३९२/ऊर्जा-६, दिनांक २३/०६/२००८ सोबत जनहित याचिका क्र. १२९/०३ संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पुनर्रचित करण्यात आलेल्या तज्ञ समितीने शासन निर्णयाच्या पुनर्विलोकनानंतर केलेल्या शिफारशी विचारात घेऊन तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे त्रिभाजन झाल्यामुळे यापूर्वीचा दिनांक २८/०९/२००४ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमधील अपंगासाठी सुयोग्य सुधारित पदनिश्चिती करुन पदांच्या यादीची सुधारित प्रत पाठविली आहे. या सुधारित यादीमध्ये अपंगांच्या प्रवर्गासाठीचे आरक्षण काहीं पदांसाठी बदलण्यात आले आहे.

३. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. ईएसटी-००४/सीआर-८३९२/ऊर्जा-६, दिनांक २३/०६/२००८ ची प्रत व अपंगासाठी आरक्षित व निश्चित केलेल्या सुयोग्य पदांच्या यादीची सुधारित प्रत माहितीसाठी मार्गदर्शनासाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की त्यांनी शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तीसाठी आरक्षित व निश्चित केलेल्या सुयोग्य पदांवर विभागीय पदोन्नतीद्वारे आणि सरळसेवेने भरती करताना सुधारित सूचनाचा अवलंब करावा आणि आरक्षण निश्चित करावे.

४. परिणामी, प्रशासकीय परिपत्रक क्र. २, दिनांक ४/१०/२००५ च्या सोबत जोडलेल्या पदांची यादी आता रद्द ठरविण्यात येत आहे.

५. हे प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या WWW.mahadiscom.in या वेबसाईटवरही उपलब्ध आहे.

सोबत : शासन निर्णय क्र. ईएसटी-००४/
सीआर-८३९२/ऊर्जा-६,
दिनांक २३/०६/२००८ (पृष्ठ १ ते ६)

**(सु.य.पाटील)**
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रत :
म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादितच्या विभागीय कार्यालय व त्यावरील सर्व स्तरापर्यंत.

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम,१९९५ नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्या कार्यालयातील (गट-अ ते गट-ड) पदावर शारिरिकदृष्टया अपंगासाठी आरक्षण ठेवण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक इएसटी-००४/सीआर ८३९२/ऊर्जा-२
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक :-२३ जून,२००८

वाचा :- १) शासन निर्णय, उ.ऊ.व का.विभाग क्रमांक इएसटी-००४/सीआर ८३९२/ऊर्जा-६ दिनांक २८.९.२००४
२) शासन पत्र,उ.ऊ.व का.विभाग क्रमांक-इएसटी-००४/सीआर ८३९२/ऊर्जा-६, दिनांक २४.८.२००६

**प्रस्तावना :-** अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम,१९९५ अंतर्गत पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळांतर्गत कार्यरत असलेल्या पदांसाठी सुयोग्य पदे निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यानंतर सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक १३ जुलै,२००५ च्या पत्रातील सुचनेनुसार अपंगांसाठी पदे निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीने २४ ऑगस्ट २००५ च्या शासन पत्रानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला कळविण्यात आलेले आहे.

दरम्यान मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्रमांक ७०/२००२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ६.८.२००६ रोजी दिलेल्या निर्णयातील परिच्छेद ४ (१)(२) नुसार प्रतीवादी संस्थेच्या वकीलांशी दिनांक २६ सप्टेंबर २००६ रोजी झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे त्रिभाजन झाल्यामुळे नव्याने स्थापन झालेल्या तीन विद्युत कंपन्यांमध्ये अपंगासाठी स्वतंत्रपणे सुयोग्य पदे निश्चित करण्याबाबतची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

जनहित याचिका क्र.१२९/०३ संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार पुनर्रचित करण्यात आलेल्या तज्ञ समितीने शासन निर्णयाच्या पुनर्विलोकनानंतर केलेल्या शिफारशी विचारात घेऊन तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे त्रिभाजन झाल्यामुळे यापूर्वीचा दिनांक २८.९.२००४ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून नव्याने स्थापन

झालेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमधील कर्मचारी/अधिकाऱ्यांसाठी शासन निर्णयान्वये अपंगांसाठी सुयोग्य सुधारित पदनिश्चिती करण्यात येत आहे. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी त्यांच्या अधिनिस्त सर्व पदांना सदर आरक्षणानुसार तसेच केंद्र शासनाच्या क्रमांक ३६०३५/३/२००४/Estt (RES), दिनांक २९ डिसेंबर,२००५ नुसार लागू करण्याबाबतची कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-अपंग-२००७/प्र.क्र.७४/सुधार-३, दिनांक १६ जून,२००८ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(मोहन पांढरकामे)
शासनाचे अवर सचिव

प्रत -

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपालांचे कार्यालय,मलबार हिल, मुंबई-४००००६,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (ऊर्जा)यांचे स्वीय सहाय्यक,
सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
निवासी लेखा अधिकारी,मुंबई
आयुक्त,अपंग कल्याण, ३ चर्च रोड,पुणे,
कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग(१६ अ), मंत्रालय,मुंबई,
कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग(सुधार-३)मंत्रालय,मुंबई
कक्ष अधिकारी,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग (प्रशा-४), मंत्रालय,मुंबई,
निवड नस्ती. (ऊर्जा-२)

## महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्यादित मधील पदांची नामावली

| अ.क्र | पदनाम | अंध | मुकबधिर | अस्थिव्यंग | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | वर्ग -१ तांत्रिक अतांत्रिक | | | | |
| १. | मुख्य महाव्यवस्थापक(लेखा व वित्त) | PS | PD | OL | |
| २. | मुख्य महाव्यवस्थापक (अंतर्गत तपासणी) | PS | PD | OL | |
| ३. | मुख्य लेखाधिकारी/महाव्यवस्थापक(लेखा व वित्त) | PS | PD | OL | |
| ४. | सह मुख्य लेखाधिकारी/व्यवस्थापक (लेखा व वित्त) | PS | PD | OL/OA | |
| ५. | उप मुख्य लेखाधिकारी/उप व्यवस्थापक (लेखा व वित्त) | PS | PD | OL/OA | |
| ६. | लेखाधिकारी/सहाय्यक व्यवस्थापक (लेखा व वित्त) | PS | PD | OL/OA | |
| ७. | उप मुख्य अभियंता (स्थापत्य) | PS | PD | OL | |
| ८. | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | PS | PD | OL | |
| ९. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | PS | PD | OL | |
| १०. | उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | PS | PD | OL | |
| ११. | मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापन) | PS/B | PD | OL | |
| १२. | महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापन) | PS/B | PD | OL | |
| १३. | उप महाव्यवस्थाक (माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापन) | PS/B | PD | OL | |
| १४. | प्रणाली विश्लेषक | PS | PD | OL | |
| १५. | अनुदेशक | PS | PD | OL | |
| १६. | संचालक (मानवी संसाधन) | PS | PD | OL | |
| १७. | मुख्य महाव्यवस्थापक (क) | PS | PD | OL | |
| १८. | महा व्यवस्थापक | PS | PD | OL | |
| १९. | कंपनी सचिव | PS | PD | OL | |
| २०. | उप महाव्यवस्थापक (क) | PS/B | PD | OL/OA | |
| २१. | आस्थापना अधिकारी/व्यवस्थापक (क) | PS/LV | PD | OL/OA | |
| २२. | उप आस्थापना अधिकारी/उप व्यवस्थापक (क) | PS/LV | PD | OL/OA | |
| २३. | लघुलेखक विशेष श्रेणी | B/LV | PD | OL/BL | |
| २४. | व्यवस्थापकीय संचालक यांचे खाजगी सचिव | B/LV | PD | OL/OA | |
| २५. | सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी/सहा.व्यवस्थापक (क) | B/LV | PD | OL/OA | |
| २६. | मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी | B/PS | PD | OL | |
| २७. | सह मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी | B/PS | PD | OL | |
| २८. | उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी | B/PS | PD | OL | |
| २९. | औद्योगिक संबंध अधिकारी | B/PS | PD | OL | |
| ३०. | मुख्य विधी सल्लागार | B/PS | PD | OL/OA | |
| ३१. | उप विधी अधिकारी | B/PS | PD | OL/OA | |
| ३२. | मुख्य जनसंपर्क अधिकारी | B/LV | PD | OL/BL/OA | |
| ३३. | उप मुख्य जनसंपर्क अधिकारी | B/LV | PD | OL/BL/OA | |
| ३४. | कार्यकारी संचालक (भांडार) | LV | PD | OL/OA | |

| अ.क्र | पदनाम | अंध | मुकबधिर | अस्थिव्यंग | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| ३५. | मुख्य अभियंता (भांडार) | PS | PD | OL | |
| ३६. | अधीक्षक अभियंता (भांडार) | PS | PD | OL | |
| ३७. | कार्यकारी अभियंता (भांडार) | PS | PD | OL | |
| ३८. | उप कार्यकारी अभियंता (भांडार)/भांडार अधिकारी | PS | PD | OL | |
| ३९. | कार्यकारी संचालक (वितरण) | PS | PD | OL | |
| ४०. | मुख्य अभियंता (वितरण) | PS | PD | OL | |
| ४१. | मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ) | PS | PD | OL | |
| ४२. | अधीक्षक अभियंता (वितरण) | PS | PD | OL/OA | |
| ४३. | प्रशिक्षण संचालक | LV | PD | OL/OA | |
| ४४. | संशोधन संचालक | PS | PD | OL | |
| ४५. | कार्यकारी अभियंता (वितरण) | PS | PD | OL | |
| ४६. | व्यवस्थापकीय संचालक यांचे तांत्रिक सहायक | PS | PD | OL | |
| ४७. | उप कार्यकारी अभियंता (वितरण) | PS | PD | OL | |
| ४८. | संचालक (द व सुं) | LV/PS | PD | OL/OA | |
| ४९. | उप संचालक (द. सुं व अंमलबजावणी) | LV/PS | PD | OL/OA | |
| ५०. | सहायक संचालक (दक्षता) | PS | PD | OL/OA | |
| ५१. | दक्षता/सुरक्षा अधिकारी | अपात्र | अपात्र | अपात्र | |
| ५२. | दुरध्वनी पर्यवेक्षक | B/LV | PD | OL/OA | |
| | **वर्ग -२ तांत्रिक अतांत्रिक** | | | | |
| ५३. | विभागीय लेखापाल | PS | PD | OL/OA | |
| ५४. | विधी सहायक | PS | PD | OL | |
| ५५. | सहायक अभियंता (स्थापत्य) | PS | PD | OL | |
| ५६. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | PS | PD | OL | |
| ५७. | मुख्य आरेखक | PS | PD | OL | |
| ५८. | सहायक अनुदेशक | PS | PD | OL | |
| ५९. | वरिष्ठ आधारसामग्री पर्यवेक्षक | PS | PD | OL | |
| ६०. | आधारसामग्री पर्यवेक्षक | PS | PD | OL | |
| ६१. | संगणक चालक | LV/B | D | BL/OL | |
| ६२. | सहायक संगणक चालक | LV/B | D | BL/OL | |
| ६३. | आस्थापना अधीक्षक/कनिष्ठ व्यवस्थापक (क) | LV/PS | PD | OL/OA | |
| ६४. | भाषांतरकार नि मुद्रित शोधक | LV/PS | PD | OL/OA | |
| ६५. | लघुलेखक (निवड श्रेणी) | B/LV | PD | OL/BL | |
| ६६. | कामगार अधिकारी | LV/PS | PD | OL/OA | |
| ६७. | सहाय्यक कामगार अधिकारी (क्रिडा) | PS | PD | OL | |
| ६८. | जनसंपर्क अधिकारी | LV/B | PD | OL/OA | |
| ६९. | चित्रकार | PS | D | OL/BL | |
| ७०. | सहाय्यक अभियंता (भांडार) | PS | PD | OL | |
| ७१. | भांडार अधीक्षक | PS | PD | OL | |

| अ.क्र | पदनाम | अंध | मुकबधिर | अस्थिव्यंग | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| ७२. | कनिष्ठ अभियंता भांडार | PS | PD | OL | |
| ७३. | सहाय्यक अभियंता (वितरण) | PS | PD | OL | |
| ७४. | कार्यशाळा कार्यदेशक | PS | PD | OL | |
| ७५. | कनिष्ठ अभियंता (वितरण) | PS | PD | OL | |
| ७६. | मुख्य कार्यदेशक | PS | PD | OL | |
| ७७. | वरिष्ठ कार्यदेशक | PS | PD | OL | |
| ७८. | तारमार्ग बांधकाम कार्यदेशक | PS | PD | OL | |
| ७९. | अंदाजकार श्रेणी-१ | PS | PD | OL | |
| ८०. | उप सुरक्षा/दक्षता अधिकारी | अपात्र | अपात्र | अपात्र | |
| ८१. | सहाय्यक निवास व्यवस्थापक | LV | PD | OL/OA | |
| | **वर्ग -३ तांत्रिक अतांत्रिक** | | | | |
| ८२. | सहायक लेखापाल/सहायक लेखा परीक्षक | PS | PD | OL | |
| ८३. | उच्चस्तर लिपिक (लेखा/साप्रवि) | LV | PD | OL/OA | |
| ८४. | निम्नस्तर लिपिक | LV | PD | OL/OA | |
| ८५. | दुय्यम अभियंता (स्थापत्य) | PS | PD | OL | |
| ८६. | दुय्यम अवेक्षक (श्रेणी-१)/ (श्रेणी-२) | PS | PD | OL | |
| ८७. | कारागीर अ/ब (स्थापत्य) | PS | PD | OL | |
| ८८. | वरिष्ठ आरेखक | PS | PD | OL | |
| ८९. | कनिष्ठ आरेखक | PS | PD | OL | |
| ९०. | अनुरेखक | PS | PD | OL | |
| ९१. | निलप्रत मुदक | PS | PD | OL | |
| ९२. | कनिष्ठ छिद्रांक पर्यवेक्षक | PS | PD | OL | |
| ९३. | वरिष्ठ लिपिक | LV | PD | OL/OA | |
| ९४ | लघुलेखक (इंग्रजी/मराठी) | B/LV | PD | OL/BL | |
| ९५ | लघुटंकलेखक | B/LV | PD | OL/BL | |
| ९६ | मुख्य/वरिष्ठ टंकलेखक | B/LV | PD | OL/BL | |
| ९७ | दुरध्वनी चालक | B | PD | OL/BL/OA | |
| ९८ | वाहन चालक | अपात्र | अपात्र | अपात्र | |
| ९९ | मुख्य पहारेकरी | अपात्र | अपात्र | अपात्र | |
| १०० | अभिलेख पृथकार | LV/PS | PD | OL/OA | |
| १०१ | भांडार सहाय्यक | LV/PS | PD | OL/OA | |
| १०२ | कनिष्ठ भांडार सहाय्यक | LV/PS | PD | OL/OA | |
| १०३ | दुय्यम अभियंता (वितरण) | PS | PD | OL | |
| १०४ | तारमार्ग कार्यदेशक | PS | PD | अपात्र | |
| १०५ | तारमार्ग तंत्री / वरिष्ठ तंत्रज्ञ (Lineman) | PS | अपात्र | अपात्र | |
| १०६ | मीटर वाचक पर्यवेक्षक | PS | PD | OL/OA | |
| १०७ | मीटर परीक्षक श्रेणी - १/२ | PS | PD | OL/OA | |
| १०८ | मीटर तपासनीस | PS | PD | OL/OA | |
| १०९ | मीटर वाचक | PS | PD | OL/OA | |

| अ.क्र | पदनाम | अंध | मुकबधिर | अस्थिव्यंग | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| ११०. | मीटर यांत्रिक | PS | PD | OL/OA | |
| १११ | कनिष्ठ यंत्रचालक | PS | PD | OL/OA | |
| ११२ | दुय्यम अभियंता स्वयंचल | PS | PD | OL | |
| ११३ | केबल संधाता/ सहाय्यक केबल संधाता | PS | PD | OL | |
| ११४ | तारमार्ग निरिक्षक | PS | PD | OL | |
| ११५ | तांत्रिक पर्यवेक्षक | PS | PD | OL | |
| ११६ | कारागीर - अ (विविध व्यवसाय) | LV/PS | PD | OL | |
| ११७ | कारागीर - ब (विविध व्यवसाय) | LV/PS | PD | OL | |
| ११८ | कारागीर - क (विविध व्यवसाय) | LV/PS | PD | OL | |
| ११९ | कारागीर - क (मिटर वाचक) | PS | PD/D | OL | |
| १२० | अंदाजकार श्रेणी - २ | PS | PD | OL | |
| १२१ | सहाय्यक सुरक्षा/दक्षता अधिकारी | अपात्र | अपात्र | अपात्र | |
| १२२ | कनिष्ठ सुरक्षा/दक्षता अधिकारी | अपात्र | अपात्र | अपात्र | |
| | **वर्ग - ४ तांत्रिक अतांत्रिक** | | | | |
| १२३ | शिपाई नि बील वितरक/शिपाई | LV | PD | OL/OA | |
| १२४ | ब्रॅडमा यंत्रचालक | PS | PD | OL | |
| १२५ | मुकादम (स्थापत्य) | LV | PD | OL/OA | |
| १२६ | नळ कारागीर | LV | PD | OL/OA | |
| १२७ | खानसामा | LV | PD | OL/OA | |
| १२८ | बील वितरक | LV | PD | OL/OA | |
| १२९ | माळी | LV | PD/D | OL/OA | |
| १३० | मदतनीस (विविध व्यवसाय) | LV | PD/D | OL/OA | |
| १३१ | पाणी पुरवठा परिचर | LV | PD/D | OL/OA | |
| १३२ | दप्तरी | LV | PD/D | OL/OA | |
| १३३ | नाईक | LV | PD/D | OL/OA | |
| १३४ | हमाल | LV | PD/D | OL/OA | |
| १३५ | स्वच्छक | LV | PD/D | OL/OA | |
| १३६ | कारागीर - ड (विविध व्यवसाय) | LV | PD/D | OL/OA | |
| १३७ | तंत्रज्ञ /सहायक तारतंत्री (Asstt. Lineman) | PS | PD | अपात्र | |
| १३८ | कनिष्ठ तंत्रज्ञ (Line Helper) | PS | PD | अपात्र | |
| १३९ | पहारेकरी | अपात्र | अपात्र | अपात्र | |

टीप : PS – Partially Sighted
PD - Partially Deaf
OL – One Leg Affected
BL - Both Leg Affected
LV - Low Vision
B - Blind
OA – One Arm Affected

( मोहन पांढरकामे )
अवर सचिव,ऊर्जा-२